महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९४०३२ Email ID : napu15.mhpds@gov.in

---

**क्रमांक :** ससेनि-१३२२/प्र.क्र. ६३/ना.पु.-१५ **जाहिरात क्रमांक :** प्र.क्र.६३/२०२२

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३**

१. महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत **गट-क** मधील खालील संवर्गातील एकूण **३४५** पदांच्या भरतीकरीता आय.बी.पी.एस. (Institute of banking Personnel Selection) मार्फत **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३** घेण्यात येणार असून परीक्षेचा दिनांक विभागाच्या https://mahafood.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. विभागाच्या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी इच्छुक उमेदवारांची राहील.

| अ.क्र. | संवर्ग | वेतनश्रेणी | विभाग/कार्यालय | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | पुरवठा निरीक्षक, गट-क | S-१०: रु. २९२००-९२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | १.१ कोकण | ४७ |
| | | | १.२ पुणे | ८२ |
| | | | १.३ नाशिक | ४९ |
| | | | १.४ छत्रपती संभाजीनगर | ८८ |
| | | | १.५ अमरावती | ३५ |
| | | | १.६ नागपूर | २३ |
| २ | उच्चस्तर लिपिक, गट-क | S-८ : रु. २५५००-८११०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय यांचे कार्यालय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई. | २१ |

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या **पुरवठा निरीक्षक, गट-क** व **उच्चस्तर लिपिक, गट-क** संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील सोबतच्या **परिशिष्ट-एक** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे https://ibpsonline.ibps.in/fcscpdjun23/ या लिंकद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :**

४.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना विभागाच्या https://mahafood.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ केवळ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद पुरवठा निरीक्षक व उच्चस्तर लिपिक पदाकरीता जाहिरातीमध्ये नमूद नियुक्ती प्राधिकारी निहाय कार्यालयाच्या संदर्भात परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत विभागीय आयुक्तांकडून/वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

४.४ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, दिव्यांग, खेळाडू, अनाथ) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे

उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जातील. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४.५ परीक्षा स्थगित करणे,रद्द करणे,अंशतः बदल करणे,पदांच्या एकूण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे तसेच भविष्यात शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल झाल्यास त्याबाबत संकेतस्थळावर प्रसिद्धीच्या अधीन राहून अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

४.६ महिला, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,पदवीधर अंशकालीन, दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.७ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी **(Domiciled)** असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दि. ४ मे,२०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांसाठी निवडीकरिता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आली आहे.

४.८ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रर्वगासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रचलित शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.९ एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.१० समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण- १११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.११ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.१२ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा, १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१४ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै,२००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार संबंधित पदांच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास ते उमेदवार संबंधित पदांसाठी अर्ज करू शकतील. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांचा वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

४.१५ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता (सामाजिक अथवा समांतर अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार) विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४.१६ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) आवश्यक राहील व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा अशा उमेदवारांची नियुक्ती विना सूचना रद्द करण्यात त येईल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे कागदपत्रे तपासणीच्या वित्तीय वर्षातील वैध प्रमाणपत्र आवश्यक राहील.(इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२३)

४.१७ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित /उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षण प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१८ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**४.१९ खेळाडू आरक्षण :-**

४.१९.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो -२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक, क्रमांक :राक्रीधो- २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जुन, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१९.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१९.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे, अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१९.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१९.५ परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**४.२० दिव्यांग आरक्षण :-**

४.२०.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक : न्यायाप्र-२०२१/१२८/ प्र.क्र.२०/ना.पु.१२, दिनांक २४ मे, २०२१ : दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदे दिव्यांगांसाठी सुनिश्चित करणेबाबत यासंदर्भात शासनाकडून जारी करण्यात आलेल्या या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२०.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील सोबतच्या परिशिष्ट-दोन प्रमाणे आहे.

४.२०.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या **एकूण पदसंख्येपैकी** असतील.

४.२०.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित पदाकरीता पात्रता शासनानाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२०.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

४.२०.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी/सवलतीसाठी पात्र असतील.

४.२०.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार/व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील :-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

(२) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती.

४.२०.८ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.२०.९ दिव्यांगाची पदे भरताना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: दिनांक १९ मार्च,२०१० मधील सुचनेनुसार दिव्यांगांची पदे सामाजिक प्रवर्गात दर्शविण्यात आलेली नाहीत. मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेले उमेदवार ज्या प्रवर्गाचे असतील त्याच सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल. अशा परिस्थितीत जेवढी दिव्यांगाची पदे भरण्यात येतील तेवढी पदे त्या सामाजिक आरक्षणातील समांतर आरक्षणाव्यतिरिक्त इतर पदामधून कमी करण्यात येतील.

**४.२१ माजी सैनिक आरक्षण :-**

४.२१.१ उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

४.२१.२ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

**४.२२ प्रकल्पग्रस्त आरक्षण :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**४.२३ भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑगस्ट,२००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंप ग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**४.२४ पदवीधर अंशकालीन उमेदवार यांच्याकरिता आरक्षण :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

**४.२५ अनाथ आरक्षण :-**

**४.२५.१** शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार अनाथ व्यक्तींचे आरक्षण राहील.

**४.२५.२** अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**५. पात्रता :**

**५.१** भारतीय नागरिकत्व

**५.२ वयोमर्यादा :-**

**५.२.१** वयोमर्यादा गणण्याचा दिनांक : ०१ डिसेंबर, २०२३.

**५.२.२** विविध प्रवर्गासाठी किमान व कमाल मर्यादा :-

| अ.क्र. | प्रवर्ग | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | **किमान वयोमर्यादा** | |
| | सर्व प्रवर्गासाठी किमान वयोमर्यादा १८ पूर्ण इतकी राहील. | |
| २ | **कमाल वयोमर्यादा** | |
| | (१) अराखीव | ३८ |
| | (२) मागासवर्गीय/अनाथ/आ.दु.घ. | ४३ |
| ३ | **प्राविण्यप्राप्त खेळाडू** | |
| | (१) अराखीव | ४३ |
| | (२) मागासवर्गीय/अनाथ/आ.दु.घ. | ४३ |
| ४ | **माजी सैनिक** | |
| | (१) अराखीव | ३८+सेवा कालावधी+३ वर्षे |
| | (२) मागासवर्गीय/अनाथ/आ.दु.घ. | ४३+सेवा कालावधी+३ वर्षे |
| ५ | **दिव्यांग** | ४५ |
| ६ | **प्रकल्पग्रस्त** | ४५ |
| ७ | **भूकंपग्रस्त** | ४५ |
| ८ | **पदवीधर अंशकालीन उमेदवार** | ५५ |
| ९ | **अनाथ** | ४३ |

**५.२.३** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या-१२, दिनांक २५ एप्रिल, २०१६ अन्वये **खुल्या प्रवर्गासाठी** कमाल **३८** वर्षे व **मागासवर्गीय** उमेदवारांसाठी कमाल **४३** वर्षे अशी राहील.

तथापि, उन्नत व प्रगत गटामध्ये क्रिमिलेअर (Creamy Layer) मध्ये मोडणाऱ्या वि.जा.-अ,भ.ज.-ब,भ.ज.-क, भ.ज.-ड,वि.मा.प्र.,इ.म.प्र., एस.ई.बी.सी. आणि ई.डब्ल्यु.एस. (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) प्रवर्गातील उमेदवारांना वयाची ही सवलत लागु राहणार नाही.

**५.२.४** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै, २०१६ अन्वये पात्र **खेळाडूसाठी** कमाल वयोमर्यादा **४३** वर्षापर्यंत शिथिल राहील.

५.२.५ सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दिपत्रक, क्रमांक : मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० मधील तरतुदीप्रमाणे **माजी सैनिकांसाठी** कमाल वयोमर्यादा शिथिल राहील.

५.२.६ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : दिव्यांग -२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक १९ मे,२०१९ मधील तरतुदीप्रमाणे **दिव्यांग** उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा **४५** वर्षापर्यंतच शिथिल राहील.

५.२.७ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१० नुसार **प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त/दिव्यांग** इ. या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा कमाल **४५** वर्षापर्यंत शिथिल राहील. त्याबाबत उमेदवार यांनी शासन निर्णय, क्र. १०९७/ प्र. क्र. ७७/९७१६-अ, दिनांक १२ मार्च, १९९८ मधील निकष पूर्ण केलेले असावे.

५.२.८ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अशंका-१९१८/प्र.क्र५०७/१६-अ, दिनांक ०२ जानेवारी, २०१९ मधील तरतूदीनुसार **पदवीधर अंशकालीन** उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा **५५** वर्षापर्यंत शिथिल राहील.

५.२.९ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र. १८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ मधील तरतूदीनुसार **अनाथ** उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा **४३** वर्षापर्यंत शिथिल राहील.

५.२.१० विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

५.२.११ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- सनिव-२०२३ /प्र.क्र. १४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च,२०२३ नुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती साठीच्या कमाल वयोमर्यादेत **दोन वर्षे** इतकी शिथिलता देय राहील.

**५.३ अर्हता :-**

**५.३.१ शैक्षणिक अर्हता :-**

५.३.१.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

५.३.१.२ परंतु पुरवठा निरीक्षक पदासाठी, "अन्न तंत्रज्ञान किंवा अन्न विज्ञान" विषयामध्ये पदवी धारण करणा-या उमेदवारांना परिक्षेत समान गुण असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५.३.१.३ उमेदवार प्रस्तुत परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

५.३.१.४ मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**५.३.२ अर्हता गणण्याचा दिनांक :-**

५.३.२.१ प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

५.३.२.२ संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

**६. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप :-**

६.१ प्रस्तुत परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | विषय | दर्जा | माध्यम | प्रश्नसंख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिका स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | १२ वी | मराठी व इंग्रजी | २५ | २०० | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| २ | इंग्रजी | १२ वी | | २५ | | | |
| ३ | सामान्य ज्ञान | पदवी | | २५ | | | |
| ४ | बौद्धिक चाचणी व अंकगणित | पदवी | | २५ | | | |

६.२ इंग्रजी विषयाची परीक्षा इंग्रजी भाषेतून, मराठी विषयाची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल. तर सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयाच्या परीक्षेसाठी इंग्रजी व मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध असेल.

६.३ सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयाच्या परीक्षेसाठी इंग्रजी व मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध असेल.

६.४ इंग्रजी व मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील.

६.५ परीक्षेला सामान्य ज्ञान, बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा, भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल.

६.६ प्रस्तुत परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.

६.७ १०० प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाचे असून प्रत्येक प्रश्नास २ गुण असतील. (एकुण गुण २००).

६.८ वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील.

६.९ गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान **४५%** गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

६.१० परीक्षेसाठी एकत्रितपणे १२० मिनिटांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

६.११ प्रस्तुत परीक्षेकरीता अभ्यासक्रमाचा तपशील सोबतच्या परिशिष्ट-तीन येथे नमूद करण्यात आला आहे.

**७. परीक्षेकरीता अर्ज करण्याची पद्धत :-**

**७.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**७.१.१** उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://mahafood.gov.in या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा.

**७.१.२** नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

**७.१.३** आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

**७.१.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पद्धतीने करणे.

**७.१.५** परीक्षा केंद्र निवड करणे.

**७.१.६** अर्ज नोंदणी बाबतच्या सूचना सोबतच्या परिशिष्ट-सहा येथे देण्यात आल्या आहेत.

**७.१.७** उमदेवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास http://cgrs.ibps.in/ या लिंकवर किंवा १८०० १०३ ४५६६ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

**७.२ विहित कागदपत्र/प्रमाणपत्र सादर करणेबाबत :-**

**(एक)** प्रोफाईलमध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने परीक्षेकरीता अर्ज सादर करताना उमेदवारांना हस्तलिखित स्वयंघोषणापत्र व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

**(दोन)** विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची सदर परीक्षेच्या निकालानंतर अंतिम निवड झाल्यास उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार सोबतच्या परिशिष्ट-नऊ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

**(तीन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**७.३ सर्वसधारण :-**

**७.३.१** अर्ज फक्त ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येईल.

**७.३.२** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ : - https://ibpsonline.ibps.in/fcscpdjun23/

**७.४ परीक्षा केंद्र :-**

**७.४.१** अर्ज सादर करतानाच परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**७.४.२** परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असेल. परीक्षा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७.४.३** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास उमदेवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त अन्य केंद्र देण्याचा अधिकार असेल, तसे ते दिले जाऊ शकते. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७.४.४ उमदेवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावायचे आहे. या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग जबाबदार राहणार नाही.

७.४.५ एखाद्या परीक्षा केंद्रावर पुरेसे उमदेवार "ऑनलाईन" परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमदेवार झाल्यास अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास उमदेवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल.

७.४.६ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास परीक्षा केंद्र रद्द अथवा नविन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.

७.४.७ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास परीक्षा केंद्र रद्द अथवा नविन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.

७.४.८ प्रस्तुत परीक्षेकरीता विविध परीक्षा केंद्रांचा तपशील परिशिष्ट-चार येथे उपलब्ध आहे.

**७.५ परीक्षा शुल्काचा भरणा :-**

**७.५.१ परीक्षा शुल्क आकारणी:-**

प्रस्तुत परीक्षेचे शुल्क शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, प्रानिमं-१२२३/प्र.क्र.१४/का-१३.अ, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ नुसार आकारण्यात येईल.

**७.५.२ परीक्षा शुल्क :-**

| अ.क्र. | घटक | शुल्क रुपये |
|---|---|---|
| १ | अराखीव | १०००/- |
| २ | मागासवर्गीय/आ.दु.घ./दिव्यांग/अनाथ | ९००/- |
| ३ | माजी सैनिक | माफ |

७.५.३ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

७.५.४ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

७.५.५ व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, एक ई- पावती तयार होईल. 'ई- पावती' तयार न होणे अयशस्वी फि प्रदान दर्शविते. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन ई-पावतीची प्रत ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७.५.६ उमदेवार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमधील पुरवठा निरीक्षक व उच्चस्तर लिपिक या दोन्ही पदाकरीता अर्ज करु शकेल, तथापि, प्रत्येक पदाकरीता स्वतंत्रपणे अर्ज करणे बंधनकारक राहील व प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

**७.६ अर्ज सादर करण्याचा कालावधी :-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज विहित परीक्षा शुल्कासहीत सादर करण्याचा कालावधी | दि. १३ डिसेंबर, २०२३ रोजी ००.०१ पासून दि. ३१ डिसेंबर, २०२३ रोजी २३.५९ पर्यंत |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन काढून घेणे | परीक्षा दिनांकाच्या ७ दिवस अगोदर |

**८. निवडप्रक्रिया : -**

८.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी/ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

८.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा मधील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) पुरवठा निरीक्षक संवर्गातील पदे (सेवाप्रवेश) नियम, १९८८, दिनांक ०१ फेब्रुवारी, १९८९.

(२) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील वित्तिय सल्लागार व उपसचिव कार्यालयातील अधिक्षक, गट ब (अराजपत्रित) आणि कनिष्ठ लेखापाल, उच्चस्तर लिपिक, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१५.

**९. गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे :-**

९.१ पुरवठा निरीक्षक पदाच्या अंतिम शिफारशीपुर्वी **सर्वसाधारण गुणवत्ता यादी** ( General Merit List) विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९.२ त्यानंतर गुणवत्ताप्राप्त उमेदवारांची **अंतिम निवड यादी** विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**१०. प्राधान्यक्रम : -**

ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :-

**१०.१ आत्महत्याग्रस्त** शेतकऱ्याचा पाल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३/०१/२००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी).

**१०.२** उपरोक्त (१०.१) मधील अट देखील समान ठरत असल्यास अथवा उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसल्यास **वयाने ज्येष्ठ** असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**१०.३** उपरोक्त (१०.१) व (१०.२) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास **उच्चस्तर शैक्षणिक अर्हता** धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**१०.४** उपरोक्त (१०.१), (१०.२) व (१०.३) मधील अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**१०.५** ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: प्रानिमं-१२१५/प्र.क्र.५५/१५)/१३-अ, दिनांक ०५/१०/२०१५ मधील निर्णयानुसार करणेत येईल.

**११. विभागाचा पसंतीक्रम सादर करणे :-**

**११.१** उमेदवारांनी सर्व सहा विभागासाठी **पसंतीक्रम** द्यावयाचा आहे.

**११.२** उमेदवारांची निवड ही उमेदवाराने प्राधान्यक्रम दिलेल्या विभागानुसार व त्याला प्राप्त झालेल्या गुणांचे आधारे तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसारच करण्यात येणार आहे. गुणवत्ता यादीनुसार व प्राधान्यक्रम यांच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांची विभागनिहाय यादी सर्व विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात येईल.

**११.३** पुरवठा निरीक्षक आणि उच्चस्तर लिपिक संवर्गामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना त्याचे विभागाचे प्राधान्य क्रमानुसार, त्या विभागातील समांतर व सामाजिक आरक्षणनिहाय व गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना पदस्थापना देणेची पध्दती व अधिकार शासनाने स्वत:कडे राखून ठेवले आहेत. यामध्ये उमेदवारांना कार्यालय निवडण्याचे अधिकार नाहीत.

**११.४** पुरवठा निरीक्षक,गट-क संवर्गातील पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराला पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक, श्रेणी-२, धान्य खरेदी निरीक्षक, अव्वल कारकून (पुरवठा) यापैकी कोणत्याही पदावर नेमून दिलेल्या विभागांतर्गत येणा-या कोणत्याही जिल्ह्यात नियुक्ती देण्यात येईल. याबाबत उमेदवारांच्या पसंतीचा विचार केला जाणार नाही.

**११.५** उच्च र लिपिक, गट-क पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना उच्चस्तर लिपिक पदावर वित्तीय सल्लागार व उपसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांच्या कार्यालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल.

**१२. निवडसूचीची कालमर्यादा :-**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहा राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिम-१२२२/प्र.क्र.५४/ का. १३-अ, दिनांक ०४ मे, २०२२).

**१३. दिव्यांग उमेदवार : लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत :-**

**१३.१** लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या **"लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१"** तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१३.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना याबाबत माहिती भरणे आवश्यक आहे.

**१३.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वतः केली जाणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरून ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**१३.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**१३.५** परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी जाहिरातीसोबतच्या परिशिष्ट-आठ मध्ये दिलेल्या **“दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना”** चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

**१४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

नियुक्ती झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**१४.१** माध्यमिक शालांत परीक्षेत **मराठी/हिंदी** विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा यासंदर्भातील प्रचलित नियमानुसार उचित कार्यवाही केली जाईल.

**१४.२** शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) क्रमांक : मातंस-२०१२/प्र. क्र. २७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक : मातंस-२०१२/प्र. क्र. २७७/३९ , दिनांक ८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१. **किंवा** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा. **किंवा** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT ची परिक्षाउत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

**१४.३** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये निवड झालेल्या उमेदवारास संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. याबाबतचा तपशील संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून उमेदवाराला नियुक्ती पत्र/आदेशासोबत पुरविण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातील नमूद पदांची **कर्तव्ये व जबाबदाऱ्या** सोबतच्या परिशिष्ट-दहा येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

**१४.४** पुरवठा निरीक्षक संवर्गामध्ये नियुक्त केलेली व्यक्ती त्या त्या महसुली विभागांतर्गत कोठेही **बदलीस** पात्र राहील.

**१४.५** पुरवठा निरीक्षक संवर्गतील नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरुपाच्या राहतील तसेच **१ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी** असेल.

**१५. प्रवेशप्रमाणपत्र :-**

१५.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे विभागाच्या https://mahafood.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्र लिंकद्वारे परीक्षेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर उपलब्ध करून देण्यात येतील. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१५.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१५.३ परीक्षेच्यावेळी स्वतः च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतः चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१५.४ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

१५.५ नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१६. परीक्षेस प्रवेश :-**

संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल.

**१७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. **परीक्षेसंदर्भातील विशेष सूचना** परिशिष्ट-पाच येथे व **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** परिशिष्ट-सात येथे देण्यात आल्या आहेत.

**१८.** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१९.** सदर जाहिरात विभागाच्या https://mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत /-

**ठिकाण :** मुंबई.

**(तातोबा कोळेकर, सह सचिव)**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**महाराष्ट्र शासन.**

**दिनांक :** १२ डिसेंबर, २०२३.

(१) परीक्षा केंद्राच्या परिसरात, मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भात सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

परिशिष्ट- एक

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

## १. पुरवठा निरीक्षक, गट-क :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.१ कोकण विभाग (एकुण ४७ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ६ | २ | १ | १ | २ | २ | ९ | २ | ५ | ३० | १७ | ४७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | ४ | १ | १ | १३ | ५ | १८ |
| (२) महिला | २ | १ | -- | -- | १ | १ | ३ | १ | २ | ११ | ५ | १६ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (४) माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | ३ | ६ |
| (५) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (७)पदवीधर अंशकालीन | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | २ | ५ |
| (८) दिव्यांग | एकुण ४७ पदांपैकी २ पदे (१ पद अंध/अल्पदृष्टी व १ पद कर्णबधिरता/ ऐकू येण्यातील दुर्बलता) करीता आरक्षित | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| **१.२ पुणे विभाग (एकुण ८२ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १० | ६ | ३ | ३ | ३ | १ | १५ | १ | ११ | ५३ | २९ | ८२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | २ | २ | २ | २ | १ | ३ | १ | ३ | १८ | ९ | २७ |
| (२) महिला | ३ | २ | १ | १ | १ | -- | ५ | -- | ३ | १६ | ९ | २५ |
| (३) खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | १ | ४ |
| (४) माजी सैनिक | २ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | २ | ७ | ५ | १२ |
| (५) प्रकल्पग्रस्त | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | १ | ४ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (७)पदवीधर अंशकालीन | १ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | ५ | ३ | ८ |
| (८) दिव्यांग | एकून ८२ पदांपैकी ३ पदे (१ पद अंध/अल्पदृष्टी, १ पद कर्णबधिरता/ ऐकू येण्यातील दुर्बलता, १ पद अस्थी व्यंगता) करीता आरक्षित | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | एकून ८२ पदांपैकी १ पद आरक्षित | | | | | | | | | | | |

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १.३ नाशिक विभाग (एकुण ४९ पदे) | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ६ | ३ | २ | १ | २ | १ | १० | १ | ५ | ३१ | १८ | ४९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | २ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | १२ | ६ | १८ |
| (२) महिला | २ | १ | १ | -- | १ | -- | ३ | -- | २ | १० | ५ | १५ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (४) माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | ४ | ३ | ७ |
| (५) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (७)पदवीधर अंशकालीन | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | २ | ५ |
| (८) दिव्यांग | **एकुण ४९ पदांपैकी २ पदे (१ पद अंध/अल्पदृष्टी व १ पद कर्णबधिरता/ ऐकू येण्यातील दुर्बलता) करीता आरक्षित** | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| १.४ छत्रपती संभाजीनगर विभाग (एकुण ८८ पदे) | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ११ | ६ | ३ | २ | ३ | २ | १७ | २ | ९ | ५५ | ३३ | ८८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ३ | २ | २ | १ | २ | १ | ५ | १ | ४ | २१ | १० | ३१ |
| (२) महिला | ३ | २ | १ | १ | १ | १ | ५ | १ | ३ | १८ | १० | २८ |
| (३) खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | २ | ४ |
| (४) माजी सैनिक | २ | १ | -- | -- | -- | -- | ३ | -- | १ | ७ | ५ | १२ |
| (५) प्रकल्पग्रस्त | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | २ | ४ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (७)पदवीधर अंशकालीन | १ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | ५ | ३ | ८ |
| (८) दिव्यांग | **एकूण ८८ पदांपैकी ४ पदे (१ पद अंध/अल्पदृष्टी, १ पद कर्णबधिरता/ ऐकू येण्यातील दुर्बलता, १ पद अस्थी व्यंगता, १ पद विशिष्ट शिकण्याची अक्षमता करीता आरक्षित** | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | **एकूण ८८ पदांपैकी १ पद आरक्षित** | | | | | | | | | | | |

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.५ अमरावती विभाग (एकुण ३५ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५ | ३ | २ | १ | २ | १ | ७ | १ | ५ | २७ | ८ | ३५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ९ | १ | १० |
| (२) महिला | २ | १ | १ | -- | १ | -- | २ | -- | २ | ९ | २ | ११ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (४) माजी सैनिक | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ४ | १ | ५ |
| (५) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (७)पदवीधर अंशकालीन | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | १ | ४ |
| (८) दिव्यांग | **एकूण ३५ पदांपैकी १ पद (अंध/अल्पदृष्टी) करीता आरक्षित** | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| **१.६ नागपूर विभाग (एकुण २३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | ४ | ३ | २ | ३ | १ | ८ | -- | -- | २३ | -- | २३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | -- | -- | ८ | -- | ८ |
| (२) महिला | १ | १ | १ | १ | १ | -- | २ | -- | -- | ७ | -- | ७ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | १ |
| (४) माजी सैनिक | -- | १ | १ | -- | १ | -- | १ | -- | -- | ४ | -- | ४ |
| (५) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | १ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (७)पदवीधर अंशकालीन | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | -- | २ |
| (८) दिव्यांग | **एकूण २३ पदांपैकी १ पद (अंध/अल्पदृष्टी) करीता आरक्षित** | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

## २. उच्चस्तर लिपिक, गट-क :-

वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, मुंबई : (एकुण २१ पदे)

| प्रवर्ग | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा .व. | वि.मा. प्र. | आ.दु. घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | २ | १ | १ | १ | १ | -- | ४ | १ | २ | १३ | ८ | २१ |
| | रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे: | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १ | -- | १ | | | -- | १ | -- | १ | ४ | ४ | ८ |
| (२) महिला | -- | १ | १ | | | -- | १ | -- | १ | ४ | २ | ६ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | १ |
| (४) माजी सैनिक | १ | -- | १ | | | -- | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| (५) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | १ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (७)पदवीधर अंशकालीन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | २ |
| (८) दिव्यांग | **एकुण २१ पदांपैकी १ पद (कर्णबधीर/ऐकू येण्यातील दुर्बलता) करीता आरक्षित** | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट- दोन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

## विविध संवर्गाकरीता दिव्यांग सुनिश्चिती

प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या संवर्ग/पदांच्या बाबतीत खालील पदासमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी पात्र अथवा अपात्र असतील :-

| अ.क्र. | संवर्ग | शासन आदेश | दिव्यांगत्वाचा उपप्रकार |
|---|---|---|---|
| १ | पुरवठा निरीक्षक, गट-क | शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक : न्यायाप्र-२०२१/१२८/ प्र.क्र.२०/ ना.पु.१२, दिनांक २४ मे, २०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| २ | उच्चस्तर लिपिक, गट-क | शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक : न्यायाप्र-२०२१/१२८/ प्र.क्र.२०/ ना.पु.१२, दिनांक २४ मे, २०२१ | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BL, BA, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

************************

## परिशिष्ट- तीन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

### -: अभ्यासक्रम तपशील :-

| अ.क्र. | विषय | अभ्यासक्रम तपशील |
|---|---|---|
| १ | मराठी भाषा<br>(२५ प्रश्न) | * सर्वसामान्य शब्दसंग्रह<br>* वाक्यरचना<br>* व्याकरण<br>* म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग<br>* उता-यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | इंग्रजी भाषा<br>(२५ प्रश्न) | * Common Vocabulary<br>* Sentence structure<br>* Grammar<br>* Use of Idioms and Phrases and their meaning<br>* comprehension of passage |
| ३ | सामान्य ज्ञान<br>(२५ प्रश्न) | * चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील.<br>* नागरीकशास्त्र - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन), ग्राम व्यवस्थापन(प्रशासन)<br>* इतिहास- आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास<br>* भूगोल - (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी,जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नदया, उदयोगधंदे, इत्यादी.<br>* अर्थव्यवस्था - भारतीय अर्थव्यवस्था - राष्ट्रीय उत्पन्न, शेती,उदयोग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या,दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीती, इत्यादी. तसेचह शासकीय अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी.<br>* सामान्य विज्ञान - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene) |
| ४ | बुध्दिमत्ता चाचणी व अंकगणित<br>(२५ प्रश्न) | * बुध्दिमापन चाचणी - उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न.<br>* अंकगणित - बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक व टक्केवारी. |

************************

परिशिष्ट- चार

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

-: परीक्षा केंद्र :-

| विभाग | अ.क्र. | परीक्षा केंद्र |
|---|---|---|
| **कोकण** | १ | मुंबई/ नवी मुंबई/ ठाणे/MMR |
| | २ | रत्नागिरी |
| | ३ | सिंधुदुर्ग |
| **पुणे** | १ | पुणे |
| | २ | सातारा |
| | ३ | सोलापूर |
| | ४ | कोल्हापूर |
| **नाशिक** | १ | नाशिक |
| | २ | अहमदनगर |
| | ३ | जळगाव |
| | ४ | धुळे |
| **औरंगाबाद** | १ | औरंगाबाद |
| | २ | बीड |
| | ३ | नांदेड |
| | ४ | लातूर |
| **अमरावती** | १ | अमरावती |
| | २ | अकोला |
| | ३ | यवतमाळ |
| **नागपूर** | १ | नागपूर |
| | २ | भंडारा |
| | ३ | गोंदिया |
| | ४ | चंद्रपूर |
| **एकूण** | २२ | |

************************

**परिशिष्ट- पाच**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३**

**-: परीक्षेसंबंधी विशेष सूचना :-**

१) महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत **पुरवठा निरीक्षक, गट-क** संवर्गातील **एकूण ३२४** व वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयातील **उच्चस्तर लिपिक, गट-क** या संवर्गातील एकूण **२१** पदांच्या भरतीकरीता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या **दिनांक १७.०५.२०२३** च्या आदेशान्वये **उप आयुक्त (पुरवठा), कोकण विभाग** आणि **वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई** यांना प्राधिकृत केलेल्या प्राधिकारानुसार स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार शासनास असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार शासनाकडे राखून ठेवले आहेत.

३) काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://mahafood.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छुक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार प्रक्रियेतून नाकारले जातील.

५) प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करून निवड प्रक्रियेचे स्वरूप ठरविण्याचा अधिकार शासनास राहील. तसेच संबधित कार्यासाठी पुरवठा निरीक्षक पदासाठी उप आयुक्त (पुरवठा), कोकण विभाग यांना व उच्चस्तर लिपिक पदासाठी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

६) भरतीशी संबंधित सर्व बाबींमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा निर्णय **अंतिम** असेल आणि उमेदवारावर **बंधनकारक** असेल. या संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही.

७) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात वैयक्तिक उमेदवारांनी नोंदविलेल्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या बरोबर आणि चुकीच्या उत्तरांच्या मधील समानता शोधण्यासाठी करेल. या संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत उत्तरे सामायिक केली गेली आहेत आणि मिळालेले गुण वैध नाहीत असा निष्कर्ष काढला गेला असेल, तर उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत असून अशा अपात्र उमेदवारांचे निकाल रोखले जातील.

८) परीक्षा घेणाऱ्या संस्थेच्या धोरणानुसार परीक्षेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना सोडविलेल्या प्रश्नपत्रिकेचा संच दिला जाणार नाही.

************************

## परिशिष्ट- सहा

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

### -: अ) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे बाबत सूचना :-

१) https://ibpsonline.ibps.in/fcscpdjun23/ या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नविन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नविन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२) प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

३) उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रकियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४) वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

### -: ब) अर्ज नोंदणी बाबत सूचना :-

१) उमेदवारांनी https://ibpsonline.ibps.in/fcscpdjun23/ या संकेतस्थळावर जावे.

२) संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.

३) अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ईमेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

४) जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो "सेव्ह आणि नेक्स्ट" टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाइन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाइन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी "सेव्ह आणि नेक्स्ट" सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिमरित्या सादर (submition) करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

५) संक्षिप्तपणे वा अद्याक्षरे न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी. पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा.

६) एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

७) **शैक्षणिक अर्हता :** या संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

८) **श्रेणी पध्दत** : गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

९) **महिला उमेदवार :** महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (लग्नापूर्वीचे) अर्ज करणे आवश्यक आहे. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.

१०) अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास / मिळाल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

११) प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

१२) उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग जबाबदार राहणार नाही.

१३) उमेदवाराचे नाव किंवा त्याचे/तिचे वडील/पती इ.चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

१४) उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१५) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१६) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

१७) उमेदवारांनी ऑनलाइन अर्जात भरलेले तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.

१८) फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

१९) नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी पूर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.

२०) आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच 'नोंदणी पूर्ण' वर क्लिक करा.

२१) 'पेमेंट' टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे.

२२) विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

**-: क) स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे :-**

ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार स्वतःचे स्कॅन केलेले छायाचित्र प्रतिमा (digital), स्वाक्षरी आणि हस्तलिखित घोषणापत्र असणे आवश्यक आहे. नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वतः चे छायाचित्र व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करून अपलोड करावे.

## -: (क) (१) छायाचित्र प्रतिमा::-

१) छायाचित्र प्रतिमा: ( ४.५ cm x ३.५ cm) इतकी असावी.
२) छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.
३) हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले असावे.
४) टोपी, आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
५) परिमाण २००x२३० पिक्सेल (प्राधान्य)
६) स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb-५०kb दरम्यान असावा.
७) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
८) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.
९) छायाचित्रातील चेहरा अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
१०) छायाचित्र अपलोड केल्याशिवाय ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.
११) उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.
१२) ऑनलाइन अर्जामध्ये छायाचित्र अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केली आहे हे तपासावे.
१३) परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना अपलोड केलेले छायाचित्र न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## -: (क) (२) स्वाक्षरी :-

१) विहित आकार/ क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करावी.
२) उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.
३) परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य).
४) फाइलचा आकार १० KB - २० KB दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb पेक्षा जास्त नाही याची खात्री करा.
५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल.
७) परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
८) फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.
९) स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
१०) ऑनलाइन अर्जामध्ये स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.

## -: (क) (३) हस्तलिखित घोषणा :-

१) हस्तलिखित घोषणेचा मजकूर खालीलप्रमाणे आहे :-

Declaration

I, (name of the candidate) hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required.

(Candidates Signature)

२) इंग्रजी भाषेतील वर दिल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरात लिहिलेले अर्जातील माहिती बरोबर असल्याचे घोषणापत्र काळ्या शाईने पांढऱ्या कागदावर लिहिलेले असावे.

३) फाइलचा प्रकार : jpg/jpeg

४) फाइलचा आकार : ५० KB -१०० KB

५) आकार : ८०० x ४०० पिक्सेल २०० DPI ( आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य)
उदा. १० से.मी. x ५ से.मी. (रुंदी x उंची)

६) सदरचे घोषणापत्र उमेदवाराने स्वहस्तलिखित आणि फक्त इंग्रजी भाषेत लिहिलेले असावे. इतर कोणत्याही भाषेत लिहिलेले आणि अपलोड केले असल्यास, त्या उमेदवाराचा अर्ज अवैध मानला जाईल. (दृष्टीहीन उमेदवारांच्या बाबतीत जे स्वहस्ते लिहू शकत नाहीत त्यांनी घोषणेचा मजकूर टाईप करून टाईप केलेल्या घोषणेच्या खाली डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा लावावा आणि तपशिलानुसार कागदपत्र अपलोड करावे.)

**-: (क) (४) कागदपत्रे स्कॅन करणे :-**

१) स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० dpi वर सेट करा.
२) रंग true colour वर सेट करा.
३) फाइल आकार नमूद केल्याप्रमाणे असावा.
४) स्कॅनरमधील प्रतिमा छायाचित्र/स्वाक्षरी/हाताच्या काठावर क्रॉप करा
५) लिखित घोषणा, नंतर प्रतिमा अंतिम आकारात क्रॉप करण्यासाठी अपलोड editor वापरा (वर नमूद केल्याप्रमाणे).
६) इमेज फाइल JPG किंवा JPEG असावी. उदाहरण फाइल नाव आहे: image०१.jpg किंवा image०१.jpeg. प्रतिमेचे परिमाण सूचीबद्ध करून, फोल्डर फाइल किंवा फाइल प्रतिमा आयकॉनवर माऊस हलवून तपासले जाऊ शकतात.
७) MS Windows/MS Office वापरणारे उमेदवार MS Paint किंवा MS Office picture manager वापरून .jpeg मध्ये कागदपत्रे सहज मिळवू शकतात. स्कॅन केलेली कागदपत्रे 'Save As' पर्याय वापरून .jpg / .jpeg फॉरमॅटमध्ये कोणत्याही फॉरमॅटमध्ये फाइल मेनूमध्ये जतन केले जाऊ शकते. क्रॉप आणि नंतर आकार बदला पर्याय वापरून आकार समायोजित केला जाऊ शकतो.

**-: (ड) कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:-**

१) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.
२) "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा" करीता संबंधित लिंकवर क्लिक करा.
३) जेथे स्कॅन केलेले छायाचित्र / स्वाक्षरी /हस्तलिखित घोषणा फाइल जतन केली आहे ते ठिकाण निवडा आणि ब्राउझ करा.
४) फाइल वर क्लिक करून फाइल निवडा.
५) “Open/ Upload” वर क्लिक करा.
६) जर फाइलचा आकार आणि स्वरूप निर्धारित केल्याप्रमाणे नसेल तर एक त्रुटी संदेश (error message) असेल प्रदर्शित होईल.
७) अपलोड केलेल्या प्रतिमेचे पूर्वावलोकन प्रतिमेची गुणवत्ता पाहण्यास मदत करेल. अपलोड केलेल्या प्रतिमा अस्पष्ट असल्यास, ते अपेक्षित स्पष्टतेसाठी पुन्हा अपलोड केले जाऊ शकते.

जोपर्यंत उमेदवार निर्दिष्ट केल्याप्रमाणे तयंचे छायाचित्र, स्वाक्षरी आणि हस्तलिखित घोषणा अपलोड करत नाही तोपर्यंत त्यांचा ऑनलाइन अर्ज नोंदवला जाणार नाही.

**टीप :-**

१) छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी किंवा हाताने लिहिलेली घोषणा असल्यास अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
२) उमेदवारांनी ऑनलाइन अर्जाच्या फॉर्ममध्ये छायाचित्र / स्वाक्षरी / हस्तलिखित घोषणा अपलोड केल्यानंतर प्रतिमा स्पष्ट असल्याचे व योग्यरित्या अपलोड केले आहेत हे तपासावे. छायाचित्र/स्वाक्षरी/हस्तलिखित

घोषणा ठळकपणे दिसत नाही, फॉर्म सबमिट करण्यापूर्वी उमेदवार त्याचा अर्ज दुरुस्त (edit) करू शकतो आणि छायाचित्र/ स्वाक्षरी/हस्तलिखित घोषणा पुन्हा अपलोड करावे.

३) उमेदवाराने छायाचित्राच्या जागी छायाचित्र अपलोड केला आहे आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी अपलोड केली आहे याची देखील खात्री करावी. छायाचित्राच्या जागी छायाचित्र आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी योग्यरित्या अपलोड केलेली नसल्यास उमेदवाराला परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४) उमेदवाराने की अपलोड केला जाणारे छायाचित्र आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे, याची खात्री करणे आवश्यक आहे.

५) छायाचित्राच्या जागी छायाचित्र अपलोड केलेले नसल्यास परीक्षेसाठी प्रवेश नाकारला जाईल. त्यासाठी उमेदवार स्वत: जबाबदार असेल.

६) उमेदवारांनी अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.

७) ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी.

************************

**परिशिष्ट- सात**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३**

**-: उमेदवारांना सर्वसाधारण सूचना :-**

१) परीक्षेची वेळ, दिनांक, ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Call Letter) याबाबत वेळोवेळी अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

२) प्राप्त अर्जांची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३) उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

४) **परीक्षेला उशिरा येण्याबाबत :-** परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील.

६) उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बद्दल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबधितावर बंधनकारक असतील. असे बदल अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. त्याकरिता उमेदवाराने दररोज अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे असेल.

७) **वैद्यकीय प्रमाणपत्र** : शासकीय सेवेत नियुक्ती झालेनंतर संबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्ट्या सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

८) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

९) मध्यस्थ/ठग/ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

१०) **चारित्र्य प्रमाणपत्र** : शासकीय सेवेत संबंधित उमेदवाराची नियुक्ती त्याची पूर्वचारित्र्य व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा प्रकरणी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : अप-१०१२/प्र.क्र.६३/१६-अ, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच यापूर्वीच संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

११) उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर

उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

१२) अर्जात हेतूपरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेच्या वेळी नक्कल (copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार शासनास राहतील.

१३) तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्या नंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

१४) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि/किंवा प्रक्रियेचे उल्लघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात कोणत्याही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल.

१५) परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने : अनुचित प्रकार करणे किंवा, तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा, परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा, स्वतः च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा, स्वतः च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे उद्धटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे, अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.

************************

परिशिष्ट- आठ

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

-: दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना :-

१. लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना :

१) दृष्टिहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाइन परीक्षेदरम्यान त्यांच्या स्वतःच्या लेखनिकाचा वापर करू शकतात, खाली दिलेल्या (२) आणि (३) मर्यादेच्या अधीन राहून.

२) उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

३) दिव्यांगत्व परिक्षार्थी उमेदवारास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करण्यास मान्यता दिली असल्यास अशा परिस्थितीमध्ये लेखनिकाची शैक्षणिक पात्रता सदर परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

४) दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि/अथवा उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास लेखनिकाची मदत अनुज्ञेय आहे. यास्तव, लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने उत्तर छायांकित करण्यास / लिहीण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

५) लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी छायांकित करणे/लिहीणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप / मार्गदर्शन/सूचना करू नये.

६) लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा/गप्पा करु नयेत. तसेच इतर लेखनिक / उमेदवार यांच्याशी बोलू नये.

७) दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना परीक्षांचे सर्व नियम / सूचना जशाच्या तसे लागू असतील.

८) उमेदवाराने स्वतः व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसचे लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

९) उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल, परीक्षेत लेखकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.

१०) एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करता येणार नाही.

११) उमेदवार आणि लेखनिक या दोघांनाही उचित हमीपत्र द्यावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकेसाठी सर्व, विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत, तर ऑनलाइन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

१२) जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.

१३) लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये. असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.

२. फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल. जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

३. परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर चाचणी प्रशासक कर्मचाऱ्यानी परीक्षेनंतर लिखित प्रश्नाची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

४. लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (locomotor disability and cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत (किमान ४०% दिव्यांग) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे किंवा सवलतीचा वेळ अनुज्ञेय असेल.

**५. दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :-**

१) दृष्टिहीन उमेदवार (ज्यांना ४०% पेक्षा कमी अपंगत्व आहे) चाचणीची सामग्री वर्धित (मॅग्निफाइड) फॉन्टमध्ये पाहण्याची निवड करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.

२) जे उमदेवार परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना ही मार्गदर्शक तत्त्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे / स्पष्टीकरण, जर काही असतील, त्यानुसार बदलू शकतात.

**६. अतिरिक्त वेळ :** ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला **२० मिनिटे** अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

***********************

**परिशिष्ट- नऊ**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३**

**-: कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे :-**

प्रोफाईलमध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने सदर परीक्षेच्या निकालानंतर अंतिम निवड झालेल्या उमदेवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे :-

| अ.क्र. | प्रमाणपत्र/ कागदपत्र |
|---|---|
| १ | स्वयंघोषणापत्र : इंग्रजी भाषेतील परिशिष्ट-सहा (क)(३) येथे दिल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरात लिहिलेले अर्जातील माहिती बरोबर असल्याचे घोषणापत्र (काळ्या शाईने पांढऱ्या कागदावर) |
| २ | अर्जातील नावाचा पुरावा (S.S.C./तत्सम शैक्षणिक अर्हता) |
| ३ | वयाचा पुरावा : सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र. |
| ४ | शैक्षणिक अर्हता पुरावा (पदवी) |
| ५ | **जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र :** राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमदेवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र / सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा (जात प्रमाणपत्र)/( वैधता प्रमाणपत्र **६** महिन्यात सादर करणे आवश्यक) |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा |
| ७ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे **नॉन क्रिमीलेअर** |
| ८ | दिव्यांग आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| ९ | माजी सैनिक आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | प्रकल्पग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | भूकंपग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३ | पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १४ | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १५ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ., खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी, अनाथ आरक्षणाचा दावा केल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| १६ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १७ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १८ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १९ | महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Domiciled) |
| २० | लहान कुटुंबाचे प्रतिपादन |
| २१ | MSCIT/ समकक्ष प्रमाणपत्र : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.४.०२.२०१३ मध्ये नमूद प्रमाणे. |
| २२ | विहीत वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहीत मार्गाने, विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज भरावेत व पूर्व परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती उमेदवाराची निवड झाल्यास छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील. |

************************

## परिशिष्ट- दहा

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, गट-क संवर्ग, सरळसेवा भरती-२०२३

### -: कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :-

**अ) पुरवठा निरीक्षक, गट-क :-**

१) शासनाने निश्चित केलेल्या मानकानुसार शासकीय धान्य गोदामे, रास्त धान्य दुकाने व इतर तपासण्या करणे व वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे.

२) शिधापत्रिका संबंधिचे कामकाज पार पाडणे व संबंधित अभिलेख अदयावत ठेवणे.

३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राबविण्यात येणा-या शासनाच्या सर्व योजना नियमबध्द पदध्दतीने पार पाडणे.

४) सेवाप्रवेश नियम दिनांक १ फेब्रुवारी, १९८९ मध्ये दिलेल्या अनुसुचीतील निरस्त न झालेल्या सर्व संवर्गाचे कर्तव्ये पार पाडणे.

**ब) उच्चस्तर लिपिक, गट-क :-**

१) अनौपचारिक संदर्भावर विहित मुदतीत कार्यवाही करणे.

२) योजनेंतर्गत देयके पारीत करणे, योजनेसाठी आवश्यक असलेले अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्यासाठी वित्त विभागाकडे नस्ती सादर करणे, योजनेंतर्गत खर्चाच्या प्रतिपुर्तीकरीता केंद्र शासनास दावे सादर करणे.

३) महालेखापरिक्षक यांच्या आक्षेपांच्या अनुषंगाने माहिती तयार करणे. अन्नधान्य खरेदी व साठवणूकीच्या अनुषंगाने देयकांचे प्रदान करणे.

४) विकेंद्रित खरेदी योजने अंतर्गत दाव्या संदर्भातील प्रदाने.

५) न्यायालयीन प्रकरणे, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती प्रकरणे, भ.नि.नि. सर्व अग्रिमे व त्यांची व्याज आकारणी.

६) कार्यालयीन खर्चाच्या अनुषंगाने कार्यालयीन आदेश काढणे.

७) देयके संगणीकृत प्रणालीमध्ये तयार करुन कोषागारास सादर करणे व नोंदवही अद्ययावत करणे. सेवार्थ प्रणाली अद्ययावत करणे. मासिक खर्च विवरणपत्रे तयार करणे.

८) वेगवेगळ्या योजने अंतर्गत देयकांची अदायगी स्वीयं प्रपंजी (Cash Book) खाते अद्ययावत, Income Tax, GST,Grass याबाबतची कामे.

९) अर्थसंकल्प विषयक सर्व कामकाज- PLA संबंधित विषय, वित्तीय लेखाविषयक कामकाज, नोट ऑफ एरर, खर्च मेळ आणि मासिक संकलित लेखे तपासणी .

१०) अर्थसंकल्प : २४०८००२४, २४०८००७३, २४०८०२७१ संबंधीचे अर्थसंकल्पिय कामकाज. ०४०८ जमा मेळ व ग्रास, ८२२९ राखीव कल्याण निधी जमेची माहिती.

११) उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, PFMS प्रणाली विषयक आवश्यक कामकाज करणे.

१२) अर्थसंकल्प २४०८०२९१ व २४०८०२६२ अर्थसंकल्पिय कामकाज मासिक खर्च व खर्च मेळ.

१३) कार्यक्रम अंदाजपत्रक पुरक मागण्या प्रारुप सादर करणे. विनियोजन लेखाविषयक कामकाज.

१४) निरिक्षण दौरा आयोजित करुन लेखापरिक्षण करणे.

१५) नियंत्रक शिधा वाटप कार्यालय व शिधा वाटप कार्यालयातून येणाऱ्या एसओ-३ व एसओ-४ लेख्यांवरुन जमा रकमांच्या नोंदी घेऊन एसओ-२ बरोबर ताळमेळ घेणे. प्रपत्र लेख्यासंबंधी कामकाज.

१६) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत डाळ वितरणासाठी खरेदी करणे, त्याबाबत आवश्यक पत्रव्यवहार करणे.

***********************